नियमीत दि. दावा क्र. २०/२०१५
तुकाराम – वि. - विठाबाई
नि.क्र. ८५

**वादीतर्फे साक्षदार क्रमांक २**

**मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,**

माझे नांव : सुनिल सुधाकर माहुरकर
वय : ६२ वर्षे, हुद्दा : सेवानिवृत्त मुख्यालय सहाय्यक
राहणार : नागपुर, ता. जि. नागपुर

**सरतपास वादी विधीज्ञ श्री वाय.एच.उपराडे यांचे मार्फत शपथेवर सूरु -**

१. दिनांक ०४.०८.२०१५ रोजी मी आमगांव येथे निमतानदार या कार्यरत होतो. आमच्या कार्यालयाला न्यायालयामार्फत मोजणी करण्याकरीता पत्र प्राप्त झाले होते. त्यानंतर मोजणी करण्याकरीता माझी नेमणूक झाली. मी त्यानंतर लाभधारकांना नोटीस पाठविले. त्यानंतर दिनांक ०४.०८.२०१५ रोजी मी प्रत्यक्ष मिळकतीत जाऊन मोजणी केली. मी मोजणी केल्याप्रमाणे तसा नकाशा तयार केला. त्याची अ प्रत मी सोबत आणलेली आहे. मी अ प्रत नकाशा प्रमाणे क प्रत नकाशा तयार केला व माझ्या अहवालासोबत न्यायालयात सादर केला. आता मला सदरचा क प्रत नकाशा दाखविला. त्यावरील मजकूर हा अ प्रत प्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. तसेच हजर व्यक्ती व पंचांचे स्वाक्षरी आहेत. तो क प्रत नकाशा नि.क्र. २८ वर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. एच. आर. गुप्ता यांचेमार्फत सुरु–**

२. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे सि.स.क्रमांक ५९५, ५९७ ची मोजणी करुन हद्द निश्चीत करायची होती. नकाशा मध्ये ए बी सी डी अक्षराने दाखविलेली जागेचे क्षेत्र मी अ प्रत व क प्रत नकाशात दर्शविले नाही. हे म्हणणे खरे आहे की, नकाशामध्ये लाल रंगाने दर्शविलेले क्षेत्र म्हणजेच मोजणी खुलासा क्रमांक ६ मध्ये दर्शविलेले क्षेत्र नेमके किती आहे हे मी अ प्रत व क प्रत नकाशात दर्शविलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, नकाशामध्ये ए बी सी डी क्षेत्रामध्ये सिमेंट क्रांक्रीटचे फांऊडेशन आहे असे मला तुकाराम बोहरे यांनी सांगितले म्हणून मी तसे लिहलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सी.स. ५९५ चे संपूर्ण क्षेत्राची मोजणी केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी मोजणी करत असतांना सि.स. ५९५, ५९७ चे सिमांकन केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी व चुकीची मोजणी केली. हे म्हणणे खरे नाही की, मी कायदयाप्रमाणे मोजणी केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, अ प्रत, ब प्रत व क प्रत नकाशातील दर्शविलेली वस्तुस्थिती खोटी व चुकीची आहे. हे म्हणणे खरे नाही की, अ प्रत प्रमाणे मी क प्रत तयार केली. हे म्हणणे खरे आहे की,

अ प्रत नकाशामध्ये मोजणीचे क्षेत्र नमुद केलेले आहे परंतू ते क प्रत मध्ये नमूद केलेले नाही. मला मोजणी करण्याच्या सुरवातीला दुर्मिळ दगळ मिळून आला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

**आमगांव** **(समीर गोपाळ गुणारी)**

**दिनांक : ०७/१०/२०२५** **दिवाणी न्यायाधिश क-स्तर, आमगांव**